**Std.: 10 CBSE**
**Sub: Marathi**

**Rathi's Aspire Academy**
Preparing You For Tomorrow

**Pre-Board Set - I**

**Marks : 80**
**Time 3 Hrs**
**Date : 29/12/2022**

**प्र.१.** (अ) उताऱ्याच्या आधारे कृती करा:

एके दिवशी शाळेत त्यांनी एक प्रयोग करून दाखवला. भिंगाच्या साहाय्यानं सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं आणि माझ्याकडे बघून ते म्हणाले, "माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा. काहीही जाळता येईल." एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलं.

आयुष्याचं फार मोठं तत्त्वज्ञान मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं. त्यांना मी कसा विसरू शकेन? भावे सरांप्रमाणेच माझ्या शालेय आणि पुढील शैक्षणिक जीवनात जोशी सर, शिर्के सर, श्री. मालेगाववाला या सर्वांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन केलं, संस्कार केले. आयुष्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर शिदोरी दिली. संघर्षासाठी आत्मविश्वास मिळवून दिला. जगण्याचे भान दिले. आजही फिरून ते शाळेचे दिवस आठवताना एकीकडे प्रचंड दारिद्र्याचा सामना करतानाचे क्षण न क्षण आठवतात आणि त्याचवेळी माझी आई, माझे शिक्षक, माझी शाळा हे माझे संस्कार केंद्र' डोळ्यांसमोर उभे राहते. मी पुन्हा मनोमनी शाळेत जाऊ लागतो.

१) आकृतिबंध पूर्ण करा — २

लेखक डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे शिक्षक

१. ........................
२. ........................
३. ........................
४. ........................

२) आकृतिबंध पूर्ण करा : — २

भावे सरांच्या प्रयोगाचे लेखकाला झालेले फायदे

१. .................... २ . ...........................

3) स्वमत — २

भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा', या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा

निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला. 'रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी काम कर. मावशी देईल ते खा आणि इथंच राहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे. मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा.

१) आकृतिबंध पूर्ण करा. — २

निरंजनच्या मावशीच्या घराची वैशिष्ट्ये

..................
...................

| | | |
|---|---|---|
| | २) कारणे लिहा<br>निरंजन हा गुरुजींचा लाडका विद्यार्थी होता; कारण<br>निरंजन वार लावून जेवायचा; कारण-<br><br>३) स्वमत<br>'निरंजन खरा नागरिक' हे पाठाधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. | २<br><br><br><br><br>२ |
| | अपठित गदय | |
| | (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा<br><br>'श्यामची आई' हे बोधप्रद पुस्तक आहे. ते आपल्याला आदर्शाची शिकवण देते. स्वार्थत्याग, प्रामाणिकपणा, बंधुभाव, निगर्वीपणा अशा सद्गुणांचा बोध आपल्या अंतःकरणावर बिंबवते. खरा मोठेपणा कशात असतो, ते सांगते. श्याम म्हणतो, "मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर आपले नाव काही काळ नाचणे, असा मी करत नाही. हिमालयाच्या -दऱ्याखोऱ्यात असे प्रचंड गगनचुंबी वृक्ष असतील की ज्यांची नावे जगाला माहीत नाहीत. रानावनांतील कानाकोपऱ्यात असे एखादे । रमणीय व सुगंधी फूल फुललेले असेल की ज्याचा पत्ता कोणाला लागत नाही. " 'मी निर्दोष होत आहे. हळूहळू उन्नत होत आहे' अशा उत्तुंग विचारांनी ही कादंबरी तुडुंब भरलेली असल्यामुळे मला ती फार आवडते. | |
| | १) आकृतिबंध पूर्ण करा<br>"श्यामची आई' हे पुस्तक पुढील सद्गुण बिंबवते.<br>१. .............................. २. ................... ३. ........................... ४. ................................<br>२) कृती करा.<br>कादंबरीतील उत्तुंग विचार - १. .............. २. ....................... | २<br><br><br>२ |
| | विभाग २: पदय | |
| प्र. २. | (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा<br><br>फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी<br>रंग मजेचे, रंग उद्याचे, जपून ठेव सृष्टी..<br>धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू<br>मातीमध्ये जे हात राबती तयांस देऊ पुष्टी...<br>रंग मजेचे, रंग उद्याचे<br>उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे<br>गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी.....<br>रंग मजेचे, रंग उद्याचे<br>मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती<br>आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी......<br>रंग मजेचे, रंग उद्याचे<br>हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या<br>गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी....<br>रंग मजेचे, रंग उद्याचे | **२** |
| | चौकटी पूर्ण करा<br>(1) जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण - ...................<br>(२)कवितेच्या आधारे पाऊस पडण्याच्या चक्राचा ओघतक्ता तयार करा.<br><br>१. डोंगरावर बिया उधळणे २. ........................ ३. .......................... ४. आभाळातून वृष्टी होणे. | १ |

| | | |
|---|---|---|
| | (३)पुढील शब्दांचा अर्थ लिहा.<br><br>१.वृष्टी - २. फेनधवलशा ३. अनोखी<br>४. तुष्टी<br><br>(४)काव्यसौंदर्य<br>पृथ्वीचे हिरवेपण जपण्यासाठी उपाय सुचवा. | २<br><br>२ |
| प्र. ३ | पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती लिहा.<br><br>१."आधी केले मग सांगितले" या उक्तीची यथार्थता 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.<br><br>२.सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हाला समजलेला अर्थ 'जाता अस्ताला' या कवितेच्या आधारे सविस्तर लिहा. | **२**<br><br>५ |
| प्र. **४** | (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती<br><br>(१) पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा.<br><br>१.किती सुंदर आहे ताजमहाल !<br><br>२.प्रवासात भरभरून बोलावे.<br><br>(२) कंसातील सूचनेनुसार वाक्यरुपांतर करा.<br><br>१.त्यांना मी कसा विसरू शकेन? (विधानार्थी करा)<br><br>२. मुलांनी रांगेत चालावे. (आज्ञार्थी करा.)<br><br>(३) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.<br><br>(१) झोकून देणे (२) तथ्य असणे (३) सुरंग लावणे.<br><br>(आ) समानार्थी शब्द लिहा.<br><br>१. आयुष्य २. नदी ३. प्रभात ४. विद्यालय<br><br>(इ) विरुद्धार्थी शब्द लिहा.<br><br>१. स्तुती २. शक्य ३. शुद्ध ४. सकाळ<br><br>(ई) वचन बदला.<br><br>१. टोपली २. काटा ३. पत्र ४. डोंगर ५. रस्ता ६. झाड | २<br><br>२<br><br>३<br><br>४<br><br>४<br><br>४ |
| प्र.५ | विरामचिन्हे ओळखा आणि लिहा. | ५ |

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| ! | |
| . | |
| ? | |

| | | |
|---|---|---|
| | “ | <br> ‘ | | |
| **प्र.** ६ | प्रश्न. पत्रलेखन करा.<br><br>शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करण्यासाठी पत्र लिहा.<br><br>पत्ता - हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगाव दाभाडे, पुणे | ५ |
| प्र. ७ | पुढील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा.<br><br>एक शिकारी - शेतात जाळे - कबुतरांचा थवा - शेतातील दाणे टिपणे - जाळ्यात अडकणे - प्रमुखाचा सल्ला - जाळे घेऊन उड - कबुतर उडणे - बोध | ८ |
| **प्र.** ८ | “ पाण्याचे महत्व” यावर तुमचे विचार निबंध स्वरूपात मांडा. | १० |
| प्र. ९ | जाहिरात लेखन करा.<br><br>पुढील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा. “भव्य पुस्तक प्रदर्शन व सवलतीच्या दरात विक्री” | २ |
| प्र.१० | अपठित उतारा<br><br>वनस्पती प्राण्यांप्रमाणे इतस्ततः फिरत नाहीत. त्यांच्या मुळामुळे त्या जमिनीत रुतलेल्या असतात. अन्नरस मिसळलेले जमिनीतील पाणी मूळ शोषून घेते आणि ते वनस्पतीच्या इतर भागांना पोहोचते. डेलिया आणि गाजरासारखी काही मुळे अन्न साठवतात.<br><br>पानांना सूर्यप्रकाश आणि हवा मिळावी, म्हणून खोड वनस्पतीला वर उचलते. खोड ही अन्ननलिकासुद्धा आहे. मुळाकडून ते अन्न घेते. पान सूर्यप्रकाश आणि हवा वापरून वनस्पतीला जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न तयार करते. बाष्प निघून जाण्यासाठी पानांत छिद्रे असतात. या छिद्रांमधूनच ते प्राणवायू श्वसनाच्या रुपाने घेते. फूल बिया निर्माण करते आणि त्यांतून नवीन वनस्पती वाढतात.<br><br>प्रश्न. उताऱ्यात आलेली झाडांच्या अवयवांची नावे लिहून त्यांचे कार्य लिहा. | २ |